**Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)**
*with* **International Impact Factor 8.357**
**Peer Reviewed Journal**
**https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P079**

**e-ISSN No. 2394-8426**
**Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26**
**Issue–I(I), Volume–XIV**

# भारतीय ज्ञान प्रणालीचे स्त्रोत, आचार आणि महत्व

**प्रा. श्रीरंग दशरथ लभाने**
सहाय्यक प्राध्यापक (समाजशास्त्र विभाग प्रमुख)
स्व. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सानगडी जि. भंडारा
Mail ID. shreeranglabhane@gmail.com

**सारांश:**

भारतीय ज्ञान परंपरेने जगाला विज्ञान, गणित, चिकित्सा व भाषा यामध्ये अत्यंत महत्वपूर्ण योगदान दिले आहे. शुन्याच्या शोधापासुन आयुर्वेदाच्या चिकित्सा शास्त्रापर्यंत तसेच योग, ध्यान व तत्वज्ञानाच्या माध्यमातुन भारतीय परंपरेने जागतिक पातळीचा आपला ठसा उमटविला आहे. आजच्या काळातही भारतीय ज्ञान परंपरेचे महत्व कमी झालेले नाही. योग, ध्यान, आयुर्वेद या शाखांमध्ये जागतिक स्तरावर पुनर्जागरण होत आहे. आधुनिक शास्त्रज्ञ व विचारवंत भारतीय परंपरेच्या तत्वज्ञानातून प्रेरणा घेत आहेत. भारतीय ज्ञान परंपरा ही केवळ प्राचीने संस्कृतीचा वारसा नसुन आजच्या युगातही आपली जबाबदारी उपयुक्त सिद्ध करणारी अमूल्य ठेवा आहे. भारतीय ज्ञान प्रणाली केवळ तात्विक विचारांची जुनी नोंद नसून हजारो वर्षांपासून भारतीय समाजाला नैतिक, आध्यात्मिक, सामाजिक आणि आर्थिक मार्गदर्शन करणारी एक अखंड समग्र आणि गतिमान परंपरा आहे. ही प्रणाली धर्म या मुलभूत तत्वावर आधारित आहे जी केवळ उपासना नसून योग्य कर्तव्य आणि नीती दर्शविते.

**बिज शब्द:** भारतीय ज्ञान प्रणाली, स्त्रोत, आधार, महत्व

**प्रस्तावना:**

भारतीय ज्ञान परंपरा ही हजारो वर्षाच्या विचारधारांच्या तत्वज्ञानाच्या व विज्ञानाच्या एकत्रित प्रवासाचे मुर्त रूप आहे. ही परंपरा केवळ आध्यात्मिकतेपर्यंत मर्यादीत नसून, विविध क्षेत्रांमध्ये ज्ञानाचा सखोल विकास घडवून आणणारी आहे. भारतीय ज्ञान परंपरेचा मुख्य आधार वेद, उपनिशेद, पुराणे, तंत्रशास्त्र, आयुर्वेद, योगशास्त्र इत्यादी आहेत. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून भारताने जगाला अनेक महत्वपूर्ण संकल्पना, विचार व शास्त्रीय ज्ञान दिले.

भारतीय ज्ञान परंपरा ही अद्वित्तीय ज्ञान आणि बुद्धीचे प्रतीक आहे. ज्यामध्ये ज्ञान आणि विज्ञान वैष्विक आणि दिव्य, कर्म आणि धर्म तसेच भोग आणि त्याग याचा अद्भूत समन्वय आहे. प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीने जीवनातील नैतिक, भौतिक, आध्यात्मिक आणि बौद्धिक मुल्यावर लक्ष केंद्रीत केले आहे. नम्रता, सत्यता, शिस्त, स्वावलंबन आणि सर्वांसाठी आदर या मुल्यावर भर देत मानव व मानवतेला श्रेष्ठतेचा आधार माणुन ज्ञान परंपरा विकसीत केली आहेत.

भारतीय ज्ञान प्रणालीचा आधार वेद, उपनिषदे, पुराणे, महाकाव्ये आणि दर्शनशास्त्रे आहेत. या ग्रंथामध्ये जीवन विश्व आणि ज्ञानाचे स्वरूप यावर सखोल चिंतन केलेले आहे. ज्ञान प्रणालीचा मुख्या उद्देश व्यक्ती आणि समाजाला चार पुरुषार्थांच्या चौकटीत बांधून नीतिमान आचरण शिकविणे हा आहे. या प्रणालीचे महत्व केवळ ऐतिहासिक नसून ते वैश्विक आणि व्यावहारिक आहे. योग आणि आयुर्वेद यांसारख्या ज्ञानशाखांनी जागतिक स्तरावर आरोग्य आणि मानसिक शांतीचा मार्ग दाखवला आहे तर पर्यावरण पुरक दृष्टिकोनाने शाश्वत विकासासाठी मार्गदर्शन केले आहे.

**व्याख्या:**

"भारतीय ज्ञान प्रणाली म्हणजे प्राचीन काळापासून भारतात विकसीत झालेल्या विविध ज्ञानाची पद्धतशीर आणि समग्र प्रणाली होय. ज्यात तत्वज्ञान, विज्ञान, गणित, आयुर्वेद, खगोलशास्त्र, योग आणि कला या सारख्या अनेक विषयांचा समावेश आहे."

"प्राचीन भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये दर्शन, ज्ञान, व विश्व या तीन महत्वाच्या संकल्पना एकमेकांना पुरक ठरतात. दर्शन एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील ज्ञान एकत्रित करुन त्याचे नियोजन करुन, तत्वज्ञानासाठी मार्गदर्शक दृष्टिकोन प्रदान करते ज्याला 'विद्या' म्हटले जाते, ज्याचा उद्देश म्हणजे आत्मचिंतन व शिक्षण होय."

**उद्देश :**

१) भारतीय ज्ञान प्रणालीचे आचार, स्त्रोत व महत्व यांचे सविस्तर अध्ययन करणे.
२) प्राचीन भारतीय ज्ञान परंपरेचा तात्विक व व्यवहारिक आशय समजून घेणे.
३) भारतीय ज्ञान प्रणालीतील नैतिक मूल्ये व जीवनदृष्टी अधोरेखित करणे
४) वेद, उपनिषदे, दर्शनशास्त्रे इ. मुख्य स्त्रोतांचे विश्लेषण करणे.
५) गुरु-शिष्य परंपरा, योग, आश्रम व्यवस्था यासारख्या आचारांचे महत्व स्पष्ट करणे.
६) भारतीय ज्ञान प्रणालीचा समाज, संस्कृती व व्यक्ती विकासावर होणारा प्रभाव अभ्यासणे.
७) आधुनिक काळात भारतीय ज्ञान प्रणालीची सुसंगतता व उपयुक्तता दाखवून देणे.
८) भारतीय सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करण्याची गरज अधोरेखित करणे.

**गृहितकृत्ये :**

१) भारतीय ज्ञान प्रणाली ही मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त आहे.
२) या प्रणालीतून नैतिक मूल्ये व सदाचार समाजात दृढ होतात.
३) भारतीय ज्ञान परंपरेचा आधुनिक शिक्षण व जीवनशैलीवर सकारात्मक प्रभाव पडते.
४) गुरु-शिष्य परंपरेमुळे अनुभवाधारित व व्यवहार्य ज्ञान प्राप्त होते.
५) योग, ध्यान व आयुर्वेद यामुळे शारिरीक व मानसिक आरोग्य सुधारते.

६) भारतीय ज्ञान प्रणाली निसर्गाशी सुसंवाद व पर्यावरण संतुलन शिकवते.
७) या ज्ञान परंपरेमुळे सामाजिक समता व सहअस्तित्वाची भावना विकसित होते.
८) भारतीय ज्ञान प्रणालीचे जतन व संवर्धन केल्यास राष्ट्रीय व सांस्कृतिक अस्मिता बळकट होते.

**संशोधन पद्धती**

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक व ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. विषयाचे तर्कशुद्ध स्पष्टीकरण करण्यासाठी विश्लेषणात्मक व व्याख्यात्मक पद्धती वापरण्यात आला आहे. तसेच Online Resources चा सुद्धा वापर संशोधनासाठी करण्यात आला आहे.

**भारतीय ज्ञान प्रणालीचे वैशिष्ट्ये**

- **समग्रता व एकात्मता:**

भारतीय ज्ञान प्रणालीची समग्रता म्हणजे ज्ञानाच्या विविध क्षेत्रांचा समन्वय होय. ते तत्वज्ञान, विज्ञान, कला, संगीत व अध्यात्म यांचा एकत्रित अभ्यास करुन व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देणे. भारतामध्ये वेद, उपनिषद, आयुर्वेद व तत्वज्ञान यासारख्या शास्त्रांचा एकत्रित उपयोग करुन ज्ञानाचा गाभा तयार केला आहे.

- **अनुभवात्मक ज्ञान:**

भारतीय ज्ञान प्रणालीतील अनुभवात्मक ज्ञान हे एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे. ज्यात ज्ञानाच्या प्राप्तीसाठी अनुभवावार विशेष जोर दिला जातो. अनुभवात्मक ज्ञानामुळे व्यक्तीचा उत्तम विश्वास वाढतो व जीवनातील कठीण प्रसंगामध्ये अधिक सकारात्मक दृष्टिकोन ठेवता येतो. ज्ञानाची ही पद्धत, एकात्मता, साधना व आत्मज्ञानाची खोली वाढवते. भारतीय ज्ञान पंरपरेतील अनुभवात्मक ज्ञानामुळे व्यक्तीचा संपूर्ण विकास होतो.

- **नैतिकता व धर्म:**

नैतिकता व धर्म हे भारतीय ज्ञान प्रणालीचे आधारस्तंभ आहेत जे व्यक्तीला योग्य मार्गावर नेण्यासाठी, समाजातील एकात्मता साधण्यासाठी व जीवनात समाधान मिळविण्यासाठी मार्गदर्शन करतात. हे तत्वज्ञान व्यक्तीगत विकासासह सामाजिक समरसतेला देखील बळकटी देतात.

- **विविधता व सहिष्णुता:**

विविधता व सहिष्णुता यामुळे भारतीय ज्ञान प्रणाली अधिक समृद्ध, खुली व सहिष्णु बनते यामुळे व्यक्तींचा व्यक्तिगत विकास व सामाजिक सुसंवाद साधण्यास मदत होते या तत्वांच्या आधारावर भारतीय समाजाने अनेक आव्हानांचा सामना केला आहे व एकात्मतेचा आदर्श जागला आहे.

- **विज्ञान व तर्कशुद्धता:**

भारतीय ज्ञान प्रणालीतील विज्ञान व तर्कशुद्धता यामुळे ज्ञानाचा आधार अधिक प्रगल्भ, विस्तृत व समर्पक बनतो यामुळे व्यक्तींची विचारशक्ती अधिक व्यापक बनते. विज्ञानाची गती व परिणामकारकता वृद्धींगत होते.

- **साधना व ध्यान:**

साधना व ध्यानाद्वारे व्यक्ती आत्मा व परमात्मा यांच्यातील एकेतचा अनुभव करु शकतो. साधना व ध्यानामुळे व्यक्तीच्या विचार धारेत, आचार धर्मात व जीवनशैलीत सकारात्मक बदल घडवतात साधना व ध्यान हे शरीर, मन व आत्मा यांच्यातील समन्वय साधण्यासाठी महत्वाचे आहेत.

- **कला व साहित्य:**

भारतीय ज्ञान प्रणालीतील कला व साहित्य हे केवळ अभिव्यक्तीचे साधन नसुन ती समाजातील विचारधारा, नैतिकमुल्ये व आध्यात्मिकतेशी संवाद साधतात. यामुळे व्यक्तीच्या आंतरिक विकासात मदत होते व समाजातील एकता व सहिष्णुता टिकून राहते. भारतीय कला व साहित्य जगभरात भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहेत.

- **भौतिकता व आध्यात्मिकता:**

भारतीय ज्ञान प्रणालीतील भौतिकता व आध्यात्मिकता यांचे संतुलन हे एक अत्यंत महत्वाचे वैशिष्ट्य आहे. जे व्यक्तीच्या जीवनाला संपूर्णता व समृद्धी प्रदान करते. भौतिकता म्हणजे जीवनातील शारिरीक व भौतिक गरजांचा समावेश होय. भारतीय ज्ञान प्रणालीत भौतिक सुख व समृद्धीला महत्व दिले आहे.

- **शाश्वत व पर्यावरणाचे महत्व:**

भारतीय ज्ञान प्रणालीतील शाश्वत व पर्यावरणाचे महत्व हे दोन्ही विशय अत्यंत महत्वाचे आहेत. भारतीय तत्वज्ञान संस्कृती व ज्ञान परंपरेत या तत्त्वांचे स्थान विशेष आहे. शाश्वतता म्हणजे केवळ पर्यावरणाची काळजी घेणे नाही तर समाजातील मुल्ये, नैतिकता व सांस्कृतिक वारसा जपणे देखील आहे.

**भारतीय ज्ञान प्रणालीचे मुख्य स्त्रोत**

- **वैदिक साहित्य:**

यामध्ये चार वेद ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अर्थववेद आणि त्यांच्याशी संबंधित ग्रंथ जसे की उपनिषदे, ब्राम्हण आणि आरण्यक जे विश्वविज्ञान, विधी आणि तत्त्वज्ञान स्पष्ट करतात याचा समावेश आहे.

- **महाकाव्ये आणि पुराणे:**

रामायण आणि महाभारत आणि पुराणे यासारखी महाकाव्ये ज्ञान आणि नैतिक शिकवणीचे महत्त्वाचे स्त्रोत आहे.

- **तत्त्वज्ञान:**

यामध्ये भारतीय तत्त्वज्ञानाच्या सहा मुख्य शाखांचा समावेश आहे. न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्ण मिमांसा आणि वेदांत इत्यादी.

- **आयुर्वेद आणि योग:**

चरक संहिता आणि सुश्रुत संहिता यासारख्या ग्रंथासह आयुर्वेद आणि योग आरोग्य आणि जीवनशैलीसाठी ज्ञान प्रदान करतात.

- **गणित आणि खगोलशास्त्र:**

आर्यभट्ट आणि ब्रम्हागुप्त यासारख्या विद्वावानांनी दशांश प्रणाली, शुन्य आणि त्रिकोणमिती यासारख्या संकल्पना विकसित केल्या.

भारतीय ज्ञान प्रणालीचे आधार

- **ज्ञान आणि तत्वज्ञान:**

यात भारतीय तत्वज्ञानाच्या सहा प्रणालीचा समावेश आहे हे ज्ञान वैदिक साहित्य आणि उपनिषदांसारख्या प्राचीन ग्रंथामधुन येते.

- **विज्ञान आणि तंत्रज्ञान:**

यात गणित, खगोलशास्त्र, आयुर्वेद आणि योग यासारख्या क्षेत्राचा समावेश आहे जे अनुभव आणि निरिक्षणातुन विकसीत झाले आहेत.

- **कला आणि साहित्य:**

भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये कला आणि साहित्यचाही समावेश आहे जे भारतीय संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग आहेत.

- **जीवनशैली:**

ही प्रणाली केवळ ज्ञानापुरती मर्यादित नसुन, ती जीवनशैली आणि मुल्यांशी संबंधित आहे यात धर्म (नैतिक आचरण) कर्म आणि परस्पर संबंध यासारख्या संकल्पनाचा समावेश आहे.

- **सर्वांगीण विकास:**

या प्रणालीचा दृष्टिकोन मानवी जीवनातील मन, शरीर आणि आत्मा यांना एकत्रित करुन सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करतो.

- **ज्ञान हस्तांतरण:**

भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये ज्ञान हस्तांतरणासाठी गुरुशिष्य परंपरेसारख्या प्राचीन पद्धतीचा वापर केला जातो.

- **वेद:**

हे भारतीय संस्कृतीचे मुळ ग्रंथ आहेत. ज्ञान, स्त्रोते, विधी, तत्त्वज्ञान, खगोलशास्त्र आणि गणित यासारख्या अनेक विषयाचा यात समावेश आहे.

- **उपनिषदे:**

वेदांचेच भाग असुन त्यात आत्म ज्ञान आणि तत्वाज्ञानावर सखोल चिंतन आहे.

- **उपवेद:**

वेदांचे पूरक ग्रंथ आहेत ज्यात आयुर्वेद (वैदिक शास्त्र), धनुर्वेद (युद्धकला), गंधर्ववेद (संगीत) आणि स्थापत्य वेद (वास्तूशास्त्र) यांचा समावेश आहे.

- **स्मृती आणि पुराणे:**

धार्मिक सामाजिक आणि नैतिक आचरणाचे मार्गदर्शन करतात. जसे की रामायण, महाभारत आणि भगवतगीता

- **दर्शनशास्त्र:**

न्याय, वैशेषिक सांख्य, योग, मीमांसा आणि वेदान्त यासारख्या दर्शनांनी ज्ञानाच्या विविध पैलूवर प्रकाश टाकला आहे.

- **अनुभवात्मक ज्ञान:**

हे केवळ पुस्तकी ज्ञान नसून अनुभव, निरिक्षण आणि कठोर विश्लेषणावर आधारित आहे जे विज्ञान, गणित, खगोलशास्त्र, नगररचना, कला आणि आरोग्य यासारख्या क्षेत्रामध्ये दिसते.

**भारतीय ज्ञान प्रणालीचे महत्त्व**

**1. शैक्षणिक पद्धतीमध्ये योगदान:**

भारतीय ज्ञान परंपरेच्या तत्वज्ञानात शिक्षणाचे तत्व व मुल्य प्रणाली स्थापित केली आहे. गुरुशिष्य परंपरा, विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान हस्तांतरित करण्याचा मार्ग नसून, शिक्षण प्रक्रियेत मुल्यांचा, जीवनशैलीचा व व्यक्तिगत विकासाचा एक भाग बनला आहे. स्वाध्याय, चिंतन, मनन व ध्यान यासारख्या तत्वांनी, आधुनिक शिक्षण प्रणालीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला आहे.

**2. मानवी कल्याण व मानवी संतुलन:**

योग व ध्यान या भारतीय ज्ञानशाखा आज जागतिक स्तरावर शारिरीक, मानसिक व आध्यात्मिक स्वास्थासाठी उपयोगात आणल्या जात आहेत. भारतीय योग व आयुर्वेद या पद्धतींनी मानसिक ताण-तणाव कमी करण्यासाठी, शरीर मनाचे संतुलन राखण्यासाठी महत्वपूर्ण साधने दिली आहेत. भगवतगीता उपनिषदे व धम्मपद यासारखे ग्रंथ आजही मानसिक शांती, नैतिकता, व आत्मज्ञानासाठी मार्गदर्शक आहेत.

**3. विज्ञान व तंत्रज्ञानामध्ये योगदान:**

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

भारतीय गणित (शुन्याची संकल्पना), खगोलशास्त्र (आर्यभट्ट) व आरोग्यशास्त्र (चरक, सुश्रुत) या विज्ञान शाखा आजही महत्वाच्या ठरतात. आयुर्वेद, ज्योतिष, वास्तुशास्त्र व शल्यचिकित्सा या सारख्या भारतीय ज्ञानशाखा वैज्ञानिक संशोधनात व आधुनिक तंत्रज्ञानाच्या उभारणीत प्रेरणादायी ठरत आहेत.

**4. पर्यावरण व निसर्ग संवर्धन:**

भारतीय परंपरेत पर्यावरण व संवर्धनाला महत्व दिले आहेत. जे आजच्या काळात पर्यावरणीय शाष्वता साधण्यासाठी अत्यंत महत्वाचे आहे. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' या तत्वानुसार, वृक्ष, जलस्त्रोत, प्राणी व मानव यांच्यातील परस्पर सामंजस्य यावर आधारित एक शाश्वत जीवनशैलीची संकल्पना भारतीय संस्कृतीनी दिली आहे. भारतीय ग्रंथामध्ये निसर्गबद्दल आदर व त्याच्या रक्षणाचे महत्व स्पष्ट करण्यात आले आहे.

**5. व्यवस्थापन व नेतृत्व तत्वज्ञान:**

भारतीय ग्रंथामध्ये व्यवस्थापनाचे तत्वज्ञान (अर्थशास्त्र, महाभारत, रामायण) नेतृत्वाचे गुण स्पष्टपणे मांडले आहेत. "भगवतगीता मधील कर्मयोग व ध्येय साधनेचे तत्व, आधुनिक व्यवस्थापन व नेतृत्वात प्रभावी ठरतात. कार्यक्षम नेतृत्व, नैतिकता, निर्णयक्षमता व संघटनात्मक मुल्ये यासाठी भारतीय दृष्टिकोन आजही प्रेरणा देतात.

**6. वैचारिक दृष्टिकोन व तत्वज्ञान:**

भारतीय ज्ञान परंपरेतल्या विविध तत्वज्ञानांमध्ये जीवनातील विविध पैलूवर विचार केला आहे. अहिंसा, सर्वधर्मसमभाव, वसुधैव कुटूंबकम यांसारख्या तत्वांनी आधुनिक जगातील शांतता व सहिष्णुता यावर भर दिला आहे.

**7. सामाजिक एकात्मता व सुसंवाद:**

भारतीय ज्ञान परंपरेने 'वसुधैव कुटूंबकम' (संपूर्ण विश्व एक कुटूंब आहे) या तत्वावर भर दिला आहे. ज्यामुळे समाजात एकात्मता, सुसंवाद व सहिष्णुता वाढवता येते. योगसूत्र, गीता व उपनिषदे यामध्ये वर्णन केलेली आत्मज्ञानाची संकल्पना एकात्मतेचा संदेश देते.

**8. व्यक्तीगत व सामुहिक विकास:**

भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये आत्मज्ञान, समाधी व व्यक्तीगत विकासासाठी मार्गदर्शन दिलेले आहे ज्याचा हेतू केवळ व्यक्तीगत प्रगती नसुन, सामुहिक कल्याण साधने हाही आहे अशा ज्ञान परंपरेने समकालीन सामाजिक व व्यावसायिक जीवनातील मुल्यांना एक सकारात्मक दिशा दिली आहे.

**9. शाश्वत विकासाच्या मार्गदर्शक तत्वाची निर्मिती:**

भारतीय ज्ञान परंपरेतील, आरोग्य, तंत्रज्ञान, नितिमत्ता व सांस्कृतिक वारसा या तत्वांनी आजच्या शाश्वत विकासाच्या संकल्पनाना आधार दिला आहे. पंचमहाभुत, त्रिगुण व प्रकृती यासारख्या संकल्पनांनी आधुनिक विज्ञानाला पर्यावरणीय शाश्वतेच्या दिशेने मार्गदर्शन केले आहे.

**शैक्षणिक व संशोधन संस्थांची उभारणी:**

भारत सरकारने IKS (Indian Knowledge System) आधारित अभ्यासक्रम तयार केले आहेत. ज्यामुळे शाळा, महाविद्यालये व विद्यापीठामध्ये भारतीय ज्ञान परंपरेचा प्रेरणा घेणार आहे. राश्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये भारतीय ज्ञान प्रणालीला महत्व देऊन विद्यार्थ्यांना भारतीय इतिहास तत्वज्ञान, विज्ञान व कला शिकण्याच्या संधी दिल्या जात आहेत.

**चर्चा:**

भारतीय ज्ञान प्रणालीही एक विशाल, व्यापक प्रणाली आहे. जी हजारो वर्षापासून विकसीत झालेली आहे. जीवनाच्या प्रत्येक अंगाचा विचार भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये करण्यात आलेला आहे. तत्वज्ञान, विज्ञान, गणित, खगोलशास्त्र, कला, साहित्य, आरोग्य, चिकित्सा इत्यादी अनेक क्षेत्रामध्ये ही ज्ञान प्रणाली व्यापलेली आहे.

भारतीय ज्ञान प्रणाली एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञान हस्तांतरित करण्याची एक पद्धती आहे. वैदिक साहित्य, उपनिषदे, वेद आणि उपवेद हे भारतीय ज्ञान व्यवस्थेचा पाया आहे ही ज्ञान प्रणाली निरिक्षण, अनुभव, प्रयोग आणि सखोल विश्लेषणातुन विकसित झालेली आहे.

**निष्कर्ष :**

भारतीय ज्ञान प्रणालीचे समग्र रूप पाहिले असता असे दिसून येते की, भारतीय ज्ञान प्रणालीचे महत्व केवळ धार्मिक विचारापुरते मर्यादित नसून विज्ञान, तत्वज्ञान, कला, साहित्य, शिक्षण आणि भाषा व कृषी या क्षेत्रातही मोलाचे योगदान देणारे होते. संस्कृत, पाली आणि मागधी या भाषांमधून तात्वीक आणि सामाजिक मुल्यांचा प्रसार झाला. नैतिकता, धर्म, आश्रम व्यस्था आणि पुरुषार्थ यांच्याद्वारे समाजाची घडी बसविली. शिक्षण, कृषी, व्यापार आणि तंत्रज्ञान या क्षेत्रातही प्रगतीने देशाच्या आर्थिक आणि सामाजि विकासाला चालना दिली. कला, स्थापत्य कला आणि आयुर्वेद यामुळे जीवनशैलीत महत्वपूर्ण बदल घडले या प्रणालीचा आधुनिक काळातही उपयोग करुन भविष्याचा विकास कसा साधता येतो हेच यातुन सिद्ध झालेले दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ:**

१) राठोड डॉ. अश्विनकुमार, "प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा", श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर 2023
२) दायमा डॉ. ब्रिजमोहन, दायमा डॉ. सारिका, "भारतीय ज्ञान प्रणालीचा परिचय", विद्याभारती प्रकाशन, नागपूर
३) गजबे डॉ. विलास, कोंडेकर डॉ. संजिव, उपाध्याय डॉ. विनय, राऊत डॉ. प्रशांत, "भारतीय ज्ञान परंपरा जीवनमुल्ये व तत्वज्ञान", लोकायत पब्लिकेशन्स, सातारा, 2024
४) पोळ प्रशांत, "भारतीय ज्ञानाचा खजीना", स्नेहल प्रकाशन, पुणे 2023

https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P079
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

५) Google भारतीय ज्ञान प्रणालीचे स्त्रोत 27/11/2025
६) Google भारतीय ज्ञान प्रणालीचे स्त्रोत 27/11/2025
७) https://www.Amozon.in
८) https://www.prabhakar.in